**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत वितरीत करावयाच्या निधीबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः शापोआ-२०१२/प्र.क्र.५५५/प्राशि ४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २ फेब्रुवारी,२०१३

**संदर्भ —**

१) **केंद्र शासनाचे अर्धशासकीय पत्र क्र.१२-९/२०११-Desk (MDM),दि.११ नोव्हेंबर,२०११**

**प्रस्तावना —**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मंजूर अनुदान शासनाकडून शिक्षण संचालक (प्राथ.) यांचेकडे वितरीत केले जाते. सदरचे अनुदान शिक्षण संचालनालयाकडून संबंधित जिल्हयांना तसेच मुंबई संदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांना वितरीत करण्यात येते. त्यानंतर जिल्हास्तरावर सदरचे अनुदान गट स्तरावर आणि गट स्तरावरुन शाळा स्तरावर वितरीत करण्यात येते. सदरचे अनुदान शासनाकडून वितरीत झाल्यानंतर शाळांपर्यंत पोहचण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागतो. सदर बाब केंद्र शासनाने राज्यातील शालेय पोषण आहाराच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी नेमलेल्या तपासणी पथकाच्या (Joint Review Mission) अहवालातही नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे सदर अनुदानाचे टप्पे कमी करण्याची शिफारस Joint Review Mission ने केलेली आहे. तथापि, जिल्हा परिषद स्तरावरुन अनुदान वितरण करण्याबाबतची कार्यपध्दती शासनाच्या सर्व योजना संदर्भात एकसमान असल्याने जिल्हास्तरावरुन सदरचे अनुदान शाळास्तरापर्यंत वितरीत करण्याचे टप्पे कमी करणे शक्य होणार नाही. त्यामुळे शालेय पोषण आहार योजनेचे अनुदान शाळा स्तरावर कमीत कमी कालावधीत उपलब्ध होईल याबाबत उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालनालय स्तरावर प्राप्त अनुदानाची शाळांना दयावयाचे अनुदान आणि जिल्हास्तरावर करावयाचा खर्च असे दोन प्रकारे विभागणी करुन स्वतंत्र ग्रँट मेमोद्वारे सदर अनुदान वितरीत करण्यात यावे.

३. शासनाकडून उपलब्ध झालेले अनुदान कमी असल्यास प्रथम शाळास्तरावर दयावयाचे अनुदान वितरीत करण्यात यावे.

४. जिल्हास्तरावर जिल्हा निधीमध्ये रक्कम जमा झाल्यानंतर ज्या बाबींसाठी अनुदान प्राप्त झाले त्याच बाबींसाठी खर्च करण्यात यावा.

५. शाळास्तरावर प्रत्यक्ष निधी पोहचल्याशिवाय जिल्हास्तरावर शालेय पोषण आहाराची देयके अदा करण्यासाठी प्राप्त झालेल्या अनुदानातून कोणताही खर्च करण्यात येऊ नये.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०२०२१५०८३०६७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.03.08 15:45:20 +05'30'

(ना.उ.रौराळे)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.मंत्री /मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण, यांचे खाजगी सचिव

४. मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

५. मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा ), मंत्रालय, मुंबई

६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

९. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), सर्व जिल्हे

१०. सर्व शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका/नगरपालिका

११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

१२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

१३. सर्व मुख्य लेखा परीक्षक

१४. वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई

१५. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती)

१६. शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)

१७. निवड नस्ती, प्राशि-४